MHYA160000982026

दावा दाखल दिनांक : ०२/०२/२०२६
दावा नोंद दिनांक : ०२/०२/२०२६
निकाल दिनांक : २७/०३/२०२६
कालावधी : ०० वर्षे–०१ महिने–२४ दिवस

**बाभुळगाव, जि. यवतमाळ येथील दिवाणी न्यायाधीश, क.स्तर यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी **एच. एस. सातपुते** यांचे समोर)

**नियमीत दिवाणी दावा क्र.०७/२०२६** **निशाणी –२१/अ**

**सौ. रेणूका स्वप्नील मेश्राम**
**(लग्नापूर्वीचे नाव रेणूका लक्ष्मणराव मरापे)**
वय : २८ वर्षे, धंदा :काही नाही,
रा.मादणी,ता. बाभुळगाव, जि.यवतमाळ. } **.... वादी.**

**–विरुध्द–**

**श्री. स्वप्नील ज्ञानेश्वर मेश्राम,**
वय : ३२ वर्षे, धंदा :शेती
रा. नाकापार्डी, ता व
जि. यवतमाळ. } **.... प्रतिवादी.**

**दावा :– विवाह संबंध विच्छेदीत होवून मिळण्याकरीता**

---

**वादीतर्फे विधीज्ञ** :– **श्री. आर. पी. भुमरे**
**प्रतिवादी तर्फे विधीज्ञ** :– **श्री. एस. डी. ठाकरे**

---

## न्या य नि र्ण य

**(अधिघोषित दिनांक २७ मार्च, २०२६)**

वादीने हा दावा विवाह संबध विच्छेदीत होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२] वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, वादी व प्रतिवादी हे अनुसुचीत जमातीचे म्हणजेच आदीवासी गोंड समाजाचे आहेत. वादी व प्रतिवादी यांचा विवाह दिनांक २५.०४.२०१८ रोजी मौजे नांझा ता. कळंब, जि. यवतमाळ येथे वादीचे मामा मेश्राम यांच्या राहत्या घरी रितीरिवाजाप्रमाणे व चालीरितीनुसार संपन्न झाला. वादी ही लग्नानंतर प्रतिवादीकडे नाकापार्डी, ता.व जि. यवतमाळ येथे नांदावयास गेली. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये लग्नानंतर अंदाजे तिन महीन्यांनी वैचारीक मतभेद निर्माण झाले. वादी व प्रतिवादी यांच्यामधील वैचारिक मतभेदामुळे दोघांमध्ये सतत वाद होवू लागला. त्यामुळे वादी ही दिनांक ३१.०७.२०१८ पासून तिच्या माहेरी मौजे मादणी ता. बाभुळगाव जि. यवतमाळ येथे राहत आहे. वादी व प्रतिवादी यांच्या नातेवाईकांनी उभयंतामध्ये आपसी समेट घडवून आणण्याचा बराच प्रयत्न केला. परंतू त्याला यश आले नाही. वादी व प्रतिवादी यांचे आपसात पटत नसल्याने व भविष्यात देखील पतीपत्नी म्हणून एकत्र राहणे शक्य नसल्याने वादीने प्रतिवादीपासून घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला. वादी व प्रतिवादी हे आदिवासी समाजातील गोंड जातीचे असल्याने त्यांना हिंदुविवाह कायदा लागु होत नाही. त्यामुळे वादीने हा दावा विवाह विच्छेदनाची घोषणा होवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

०३] दाव्याच्या समन्सची योग्यरित्या बजावणी झाल्यानंतर प्रतिवादीने हजर होवून निशाणी क्र. ०८ वर लेखी कैफीयत दिलेली असून त्याने वादी व प्रतिवादी यांचा विवाह दिनांक २५.०४.२०१८ रोजी आदिवासी समाजातील चालरितनुसार झाल्याचे मान्य केले आहे. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये वैचारीक मतभेत निर्माण झाल्याने सतत भांडणे होत होती. त्यामुळे वादी ही दिनांक ३१.०७.२०१८ पासून तिच्या माहेरी मौजे मादणी, ता. बाभुळगाव, जि. यवतमाळ येथे राहत असल्याचे मान्य केले आहे. प्रतिवादीने वादीची विनंती मान्य करण्यास हरकत नसल्याबाबत त्याची कैफीयत दिलेली आहे.

०४] वादीच्या दाव्यातील कथने वादीतर्फे विधीज्ञ श्री. आर. पी. भुमरे व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.एस. डी.ठाकरे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकल्यानंतर मी निशाणी क्र. ११ वर वादमुद्दे काढलेले असून सदरचे वादमुद्दे माझ्यापुढे उपस्थीत होत असून मी त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादी ही प्रतिवादीसोबत असलेला विवाह विच्छेदीत होवून मिळण्यास मिळण्यास पात्र आहे का? | होकारार्थी. |
| २) | आदेश व हुकूमनामा काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

०५] वादीने दाव्यातील कथने शाबीत करण्यासाठी साक्षीदार क्र. १ म्हणून निशाणी क्र. १२ वर स्वतःचे शपथपत्र दाखल केले आहे. वादीने निशाणी क्र. १६ वर पुरावा संपल्याची पुरसीस दाखल केली आहे. प्रतिवादीने निशाणी क्र. १७ वर स्वतःचे शपथपत्र दाखल केलेले आहे. प्रतिवादीने निशाणी क्र.२० वर पुरावा संपल्याची पुरसीस दाखल केली आहे.

०६] वादीने निशाणी क्र.१३ वर लग्नपत्रीका, आर्टीकल–अ वर आधार कार्डची पडताळणी प्रत, आर्टीकल–ब वर लक्ष्मण तुकाराम मरापे यांच्या आधार कार्डची पडताळणी प्रत, आर्टीकल–क वर लक्ष्मण तुकाराम मरापे यांच्या मतदान कार्डाची पडताळणी प्रत, आर्टीकल–ड वर लक्ष्मण तुकाराम मरापे यांच्या कुटूंबाची शिधा पत्रीकेची पडताळणी प्रत, निशाणी क्र. १४ वर वादीच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी प्रत, निशाणी क्र. १५ वर लक्ष्मण तुकाराम मरापे यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी प्रत ई. कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे.

०७] प्रतिवादीने आर्टीकल–अ वर स्वतःच्या आधार कार्डची पडताळणी प्रत, निशाणी क्र. १८ वर शाळा सोडल्याच्या दाखल्याची पडताळणी प्रत, निशाणी क्र. १९ वर ज्ञानेश्वर उंदराजी मेश्राम यांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी प्रत ई. कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे.

## **का र ण मि मां सा**

**मुद्दा क्र. १ करीता :–**

०८] वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. वादी व प्रतिवादी यांना त्यांचा विवाह दिनांक २५.०४.२०१८ रोजी मौजे नांझा, ता. कळंब, जि. यवतमाळ येथे आदिवासी जातीरिवाजानुसार झाल्याचे मान्य आहे. वादी व प्रतिवादी हे लग्नानंतर मौजे नाकापार्डी, ता. व जि. यवतमाळ येथे एकत्र राहत होते. वादी व प्रतिवादी

यांचे वैचारिक मतभेद विकोपाला गेल्याने त्यांनी समाजातील जातीरिवाजाप्रमाणे घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला. वादी ही दिनांक ३१.०७.२०१८ पासून प्रतिवादीपासून विभक्त तिच्या माहेरी मौजे मादणी, ता. बाभुळगाव, जि. यवतमाळ येथे राहत आहे. वादीने दाव्यातील कथने पुन्हा निशाणी क्र. १२ वरील पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन न्यायालयाच्यापुढे सांगीतलेली आहेत. प्रतिवादींच्या विधिज्ञांनी उलटतपास नाकरला असल्याने वादीने शपथेवर सांगीतलेली कथने अबाधीत आहेत. प्रतिवादीने निशाणी क्र. १७ वर पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन त्याची कथने न्यायालयाच्यापुढे पुन्हा सांगीतलेली आहेत. वादींच्या विधिज्ञांनी प्रतिवादीचा उलटतपास घेण्याचे नाकारल्याने त्याच्या तोंडी पुराव्यातील कथने देखील अबाधीत आहेत. वादी व प्रतिवादी हे अनुसुचित जमातीचे म्हणजेच आदिवासी समाजाचे आहेत या बाबी देखील वादी व प्रतिवादी यांना मान्य आहेत. वादीने निशाणी क्र. १७ वर स्वतःच्या जातीच्या दाखल्याची पडताळणी प्रत दाखल केलेली आहे. वादीने निशाणी क्र. १५ वर लक्ष्मण तुकाराम मरापे हे तिचे वडील यांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी प्रत दाखल केलेली आहे. प्रतिवादीने निशाणी क्र. १८ वर शाळा सोडल्याच्या दाखल्याची पडताळणी प्रत व निशाणी क्र. १९ वर त्याचे वडील ज्ञानेश्वर उंदराजी मेश्राम यांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी प्रत दाखल केली आहे. सदर पडताळणी प्रतिचे अवलोकन केले असता त्यामध्ये वादी व प्रतिवादी हे अनुसुचीत जमातीची म्हणजेच गोंड समाजाची असल्याचे नमुद आहे.

०९] वादीने हा दावा दिवाणी प्रक्रीया संहिता कलम ९ अन्वये वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दिनांक २५.०४.२०१८ रोजी झालेला विवाह विच्छेदीत करुन मिळण्याकरीता दाखल केला आहे. हिंदु विवाह कायदा, १९५५ मधील कलम २ (२) मध्ये अनुसुचित जमातीला वगळण्यात आलेले आहे. म्हणजेच हिंदु विवाह कायदा १९५५ हा अनुसुचित जमातीला लागु होणार नाही. त्यामुळे अनुसुचित जमातीतील लोक त्यांच्या समाजातील प्रचलित असलेल्या रितीरिवाजाप्रमाणे आपसात घटस्फोट घेवू शकतात. वादी व प्रतिवादी हे अनुसुचित जमातीमधील असल्याने त्यांना हिंदु विवाह कायदा १९५५ व विशेष विवाह कायदा १९५४ यातील तरतुदी लागु होणार नाहीत. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दिनांक २५.०४.२०१८ रोजी संपन्न झालेल्या विवाहातून निर्माण झालेले पतीपत्नीचे नातेसंबंध हे विच्छेदीत करुन मागीतले आहेत. हिंदु विवाह कायदयानुसार वादी व प्रतिवादी हे अनुसुचीत जमातीतील असल्याने त्यांना सदरच्या कायदयातील तरतुदी लागु होणार नाहीत. त्यामुळे दिवाणी प्रक्रीया संहिता कलम ९ नुसार अशा स्वरुपाचा दावा या

न्यायालयाला चालविण्याचा अधिकार आहे. स्पेसीफीक रिलीफ अक्ट १९६३ चे कलम ३४ नुसार वादी व प्रतिवादी यांच्यातील विवाह हा विच्छेदीत केल्याबाबतची घोषणा या न्यायालयाला करता येईल. त्यामुळे वरील चर्चेअंती मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवीत आहे.

**मुद्दा क्र. २ करीता :–**

१०] मुद्दा क्र. १ च्या चर्चे अंती मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१) वादीचा दावा मंजुर करण्यात येतो.

२) वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दिनांक २५.०४.२०1८ रोजीच्या विवाहाने स्थापीत झालेले विवाह संबंध या आदेशाने विच्छेदीत करण्यात येत आहेत.

३) दाव्याचा खर्च ज्याचा त्याने सोसावा.

४) येणे प्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

Digitally signed by HARIDAS SANDIPAN SATPUTE
Date: 2026.03.27 17:12:09 +0530

बाभुळगाव.
दिनांक : २७/०३/२०२६.

**(एच. एस. सातपुते)**
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
बाभुळगाव.